# माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) मार्च २०२२ साठी खाजगी विद्यार्थी थेट योजना अंतर्गत ऑनलाईन नावनोंदणीकरण्यासाठी संपर्क केंद्राना

## महत्वाच्या सुचना

खाजगी विद्यार्थी नाव नोदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशिल |
|---|---|---|
| 1 | गुरूवार दिनांक 16/09/2021 ते मंगळवार दिनांक 12/10/2021 | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे |
| 2 | शुक्रवार दिनांक 17/09/2021 ते गुरूवार दिनांक 14/10/2021 | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळांमध्ये जमा करणे |
| 3 | सोमवार दिनांक 18/10/2021 | सर्व संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे प यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

अ) ऑनलाईन भरलेला अर्ज क्रमांक १७ विद्यार्थी / विद्यार्थीनी आपल्याकडे जमा करण्यास आल्यानंतर खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

ब) विद्यार्थ्याचे नावनोंदणी अर्ज आपल्या संपर्क केंद्राच्या माध्यमानुसार घ्यावे.

१. विद्यार्थी हा कमीत कमी इयत्ता ५ वी उत्तीर्ण असावा. अन्यथा अपात्र ठरविण्यात येईल.

२. विद्यार्थ्याची जन्मतारीख ३१ जुलै २००७ पुर्वीची असावी.तरच सदर विद्यार्थी शासन नियमाप्रमाणे परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र ठरतो. ३१ जुलै २००७ नंतरची जन्मतारीख असल्यास विद्यार्थ्याचा फॉर्म नं.१७ स्विकारु नये कारण सदर विद्यार्थी वयाचे १४ वर्ष पुर्ण करत नसल्यामुळे अपात्र आहे.

३. शाळा सोडण्याची दाखल्यावरील तारीख ३० ऑगस्ट २०२१ पुर्वीची असावी. मा. वि. अध्यक्षांच्या परवानगीने दि.३०/०९/२०२१ पर्यंत शिथिल परंतू दि. ३०/०९/२०२१ नंतरची शाळा सोडल्याची तारीख असल्यास अर्ज रद्द केला जाईल.

४. विद्यार्थी इयत्ता १० वीत यापुर्वी प्रविष्ट झालेला असल्यास त्याने फॉर्म नं. १७ भरु नये.

५. शाळा सोडल्याचा मूळदाखला (Original L.C.) व आधारकार्डच्या दोन छायाप्रती अर्ज क्र १७ सोबत जोडाव्यात. तसेच विद्यार्थी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नमूद केलेल्या इयत्तेच्या निकालाची प्रत सोबत जोडावी.

६. मंडळ विनियम १९७७ मधील नियम क्र. ४२ (अ) नुसार विद्यार्थी परीक्षेच्या प्रारंभाच्या तारखेच्या आधी किमान दोन वर्ष महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. अन्यथा विद्यार्थी अपात्र राहील. व त्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संपर्क केद्रांनी विद्यार्थ्यांचे नावनोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच परीक्षेचे आवेदनपत्र भरावे. **कोणताही डमी नंबर टाकून परीक्षा आवेदनपत्र भरु नये.**

८. कोणत्याही अपात्र विद्यार्थ्याचे परीक्षा आवेदनपत्र भरु नये. भरल्यास संबंधित मुख्याध्यापक / संपर्क केंद्रप्रमुख जबाबदार राहतील याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी. प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल

९. संपर्क केंद्रानी विद्यार्थ्याकडून आलेले सर्व नावनोंदणी अर्ज पडताळणी करुन मुख्याध्यापक / संपर्क केंद्रप्रमुख यांच्या स्वाक्षरीने तपासून पाठवावे.

१०. खाजगी विद्यार्थी फॉर्म नं. १७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debitcard/ Creditcard/UPI/Net Banking) वहीत द्वारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती विद्यार्थ्यांने स्वत: जवळ ठेवून त्याच्या दोन प्रती संपर्क केंद्राला द्याव्यात. तसेच एकदा नावनोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नावनोंदणी शुल्क परत केले जाणार नाही. तसेच नावनोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम,शाखा, संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नावनोंदणी शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल याची नोंद घेऊन सदर बाबतची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

११. मंडळ कार्यालयात नावनोंदणी अर्ज जमा करताना खालील तक्त्यातील नमुन्यानुसार पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे सर्व अर्ज क्रमांकानुसार एकत्रित यादी जमा करावी. विद्यार्थी अपात्र असल्यास कोणत्या कारणास्तव अपात्र आहे ते शेरा मध्ये नमूद करावे.

| अ.क्र. | संपर्क केंद्राचा सांकेतिक क्रमांक | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | माध्यम | पात्र / अपात्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

खाजगी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन शिबीराबाबत राज्य मंडळाकडून तारीख आल्यानंतर आपल्याला कळविण्यात येईल.

१२. मंडळाकडून खाजगी विद्यार्थ्यासाठी निशुल्क स्वाध्याय पुस्तिका देण्यात येतात त्या संबंधित विद्यार्थ्यास देण्यात येवून त्याच्याकडून सोडवून घेण्यात याव्यात.

१३. प्रचलित पध्दतीप्रमाणे विद्यार्थ्यांचे शिबीर आयोजन आपल्या संपर्क केंद्रावर करण्यात यावे. शिक्षण घेऊ इच्छित असणारा कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.

१४. कोणत्याही विद्यार्थी, पालकांकडून, तसेच प्रसार माध्यमाकडून, आपल्या संपर्ककेंद्राबाबत तक्रार येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

१५. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. इतर सुचना वेळोवेळी मंडळाच्या संकेतस्थळावर कळविण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी. (वेळोवेळी संकेतस्थळ पहावे)

१६. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना संबंधित संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांना अवगत करावी

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ३ ४०० ७०३.

प्रति, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालये / संपर्क केंद्र शाळा
प्रत माहितीस्तव रवाना :–

1. शिक्षण उपसंचालक (मुंबई / बृहन्मुंबई / ठाणे / रायगड / पालघर.) चर्नीरोड, मुंबई – 400 020.
2. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, (ठाणे / रायगड / पालघर.)
3. शिक्षण निरीक्षक (उत्तर / दक्षिण / पश्चिम.)
4. शाखा माध्यमिक परीक्षा